157/610

पी.यु.सी. प्रमाणपत्रांच्या दराबाबत.

महाराष्ट्र शासन
परिवहन आयुक्त यांचे कार्यालय,
५वा मजला,फाऊंटन दूरसंचार भवन-२,
महात्मा गांधी मार्ग, फोर्ट,
मुंबई - ४०० ००१.

दुरध्वनी क्रमांक ०२२-२२६१४७२६
Email ID - dycommr.enf1@gmail.com

क्र. पआका/का-२ब/नस्ती क्र.३०/२०२१ जा.क्र. 4891 दिनांक - 27 APR 2022

संदर्भ:- शासनपत्र क्र. एमव्हीआर-०१२२/प्र.क्र.०१/परि-२ दि. २५.०४.२०२२

## परिपत्रक - 25

मोटार वाहनांची वायुप्रदुषण तपासणी करून वायुप्रदुषण नियंत्रण प्रमाणपत्र जारी करण्यासाठी राज्यातील वायुप्रदुषण नियंत्रण केंद्रांनी आकारावयाची फी या कार्यालयामार्फत दि.१६.०३.२०११ रोजीच्या परिपत्राकान्वये राज्यातील सर्व प्रादेशिक / उप प्रादेशिक परिवहन अधिकारी यांना कळविण्यात आली होती.

महाराष्ट्र शासनाचे दि.२५.०४.२०२२ च्या निर्देशानुसार राज्यातील पी.यु.सी. चाचणीच्या दरामध्ये सुधारणा करुन दर वाढीस मंजुरी देण्यात आली आहे.

सुधारीत दर वाढ पुढीलप्रमाणे.

| अ. क्र. | वाहनाचे प्रकार | दि. १६.०३.२०११ च्या परिपत्रकानुसार सध्याचे दर | सुधारीत दर |
|---|---|---|---|
| १ | दुचाकी वाहन | ३५ | ५० |
| २ | पेट्रोलवरील तीनचाकी वाहन | ७० | १०० |
| ३ | पेट्रोल/सीएनजी/एलपीजी वर चालणारे चार चाकी वाहन | ९० | १२५ |
| ४ | डिझेलवर चालणारे वाहन | ११० | १५० |

हे दर तात्काळ अंमलात येत असून प्रत्येक वायु प्रदुषण तपासणीसाठी देय राहतील.

Scanned with OKEN Scanner

ह्या पत्राकाद्वारे असे निर्देश देण्यात येत आहेत की आपण आपल्या अधिपत्याखालील वायु प्रदुषण तपासणी केंद्रांच्या मालकांची बैठक घेऊन त्यांना वरीलप्रमाणे सुधारीत दरांची माहीती द्यावी, तसेच जनतेस विविध प्रसिध्दी माध्यामाद्वारे माहीती देण्यात यावी. या संदर्भाने प्रत्येक पी.यु.सी केंद्रावर सुधारीत दराचे फलक दर्शनीय ठिकाणी प्रदशित करण्यास सर्व पी.यु.सी केंद्र मालकांना सूचित करावे. या सुधारीत दरानुसार पी.यु.सी केंद्राकडून अंमलबजावणी होत असल्याबाबत खातरजमा करण्यास वायुवेग पथकास तशा सूचना जारी करण्यात याव्यात .

(डॉ. अविनाश ढाकणे )
परिवहन आयुक्त,
महाराष्ट्र राज्य, मुंबई

प्रति,

१. सर्व प्रादेशिक परिवहन अधिकारी /उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, महाराष्ट्र राज्य.
२. मा. अपर मुख्य सचिव, गृह विभाग (परिवहन) मंत्रालय, मुंबई यांना माहितीसाठी सादर.
३. परिवहन उप आयुक्त (संगणक) यांना सदर पी.यु.सी दर विभागाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्याबाबत.
४. सर्व नियंत्रक अधिकारी, परिवहन आयुक्त कार्यालय यांना माहितीसाठी.
५. ऑल पियुसी सेंटर्स ओनर्स असोसिएशन, शॉप नं २, मृणाल को.ऑ.हौ. सोसायटी, ओधव नगर, बोरीवली (पूर्व) मुंबई ४०००६६.

परिवहन आयुक्तांचे कार्यालय
जावक क्र. : 4891
प्रती : 1+1
सहपत्र :
पाठविल्याचा दिनांक : 27 APR 2022

सादर,

Scanned with OKEN Scanner